# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०९/२०१७

## १) घरातील सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी. :—

दिनांक २७/०३/२०१७ चे २०.०० ते दिनांक ०४/०६/२०१७ चे ०७.०० वा दर. यातील फिर्यादी आसाराम रामाजी वरंबे वय ५० वर्ष, रा. ईटगाव याचे घराचे खुल्या दरवाज्यातुन किचन रुम मध्ये असलेल्या स्टिलचे डब्यात २ वेळा ठेवलेले नगदी एकुण २,४५०/—रु. व बॅग मध्ये ठेवलेला १ सोन्याचा मंगळसुत्र ज्यात पदक व मनी असलेला ११ ग्रॅम, वजनाचा किंमती १६,०००/—रु. असा एकुण १८,४५०/—रु. चा माल यातील संशयीत आरोपीतांनी चोरी करण्याचा संशय असल्याबाबत खात्री झाल्याने आज रोजी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

## २) क्षुल्लक कारणावरुन स्टिलची बकेट डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १३/०९/२०१७ चे १८.४५ वा दर. यातील फिर्यादीचा मुलगा चंद्रशेखर हा त्याचे पान पुरीचा ठेला घेवुन येत असता आरोपीचे गाय ढोरे रत्यावर बांधले होते त्या हात ठेल्याचा धक्का लागल्याने फिर्यादीचा मुलगा व आरोपी यांच्यात तोंडा— तोडी भांडण होत असतांना फिर्यादीने आरोपीला हटकले असता आरोपीने शिवीगाळ करुन स्टिलची बकेट फिर्यादीचे डोक्याला मारल्याने डोक्यातुन रक्त निघुन जखमी झाल्याने फिर्यादी वंसता चेटुजी थेरे वय ३९ वर्ष, रा. आसगाव यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

## ३) महिलेचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २७/०८/२०१७ चे १५.०० वा दर. यातील आरोपी हा फिर्यादीचा आतेभाऊ असुन फिर्यादीला आपल्या आई वडीलासह नाशिक नगर भंडारा येथील किरायाचे घरी दिनांक ०४/०८/२०१७ ला आणुन ठेवले शहीद वार्ड भंडारा येथील अतुल वंजारी हयाचे घरी किरायाने घेतलेल्या रुम मध्ये नेवुन रुमचा दरवाजा लावुन फिर्यादी सोबत अश्लिल कृत्य करुन विनयभंग केला व ही माहिती कोणलाही सांगुन नको सोगितले तर जिवाने मारीन अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,३४३,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

## ४) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेवुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक १३/०९/२०१७ चे १२.०० ते १४.३० वा दर. यातील अल्पवयीन फिर्यादी मुलगी ही शाळा सुटल्या नंतर कारधा बस स्थानक येथे उभी असतांना यातील आरोपीने तिला तुझ्या घरी सोडुन देतो असे बोलुन फुस लावुन जबरीने गाडीमध्ये मांडीवर बसवुन लैगिक हेतुन स्पर्श केल्याने फिर्यादीने दक्षता समिती सदस्य समक्ष सांगितल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३६३,३५४(अ)(१) भांदवि. सहकलम ८ पोक्सो ॲक्ट २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लांडे पो.स्टे कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १२/०९/२०१७ चे १३.०० वा दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हीला यातील आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसकर पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) अज्ञात वाहन चालकांचया धडकेत एक जखमी . :—**

दिनांक १३/०९/२०१७ चे २०.४० वा दर. यातील आरोपी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने लापरवाहीने चालवुन जखमी सुरेश उपासराव कांबळे वय ७३ वर्ष, रा. कारधा हा धाब्यामधुन जेवन करुन पायी कारधा कडे जात असता त्यास धडक मारुन गंभिर दुखापत केल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने डॉक्टरी रिपोर्ट व फिर्यादी करमजीतसिंग घरभुरसिंग गिल वय ३३ वर्ष, रा. भिलेवाडा धाबा मालीक यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १३४,१८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**७) अवैध दारू/ जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक १३/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, तुमसर, वरठी, अडयाळ लाखांदुर का रधा, सिहोरा व पवनी येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून ५४ लिटर हा. भ. दारू किंमती ५४००/—रु. तसेच २० लिटर २५० मिली लिटर देशी दारु किमती ५,८५०/—रु. तसेच जुगारातुन ८१०/—रु. असा एकुण किंमती १२,०६०/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९९२७४१६८१**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.